# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

YEAR : 44) 15th January 2019 ( No. of Pages 08 ) ( No : 01


***राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-१ मधील वेतनश्रेणीबाबतच्या व अनुषंगिक शिफारशी स्वीकृत करण्याबाबत.***

## महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक : वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९ : मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

***दिनांक :- १ जानेवारी, २०१९***

**प्रस्तावना :-** केंद्र शासनाने केंद्रीय ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्यांत दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रशासनाच्या निर्णयांच्या आधारे राज्यशासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्यांत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्यासाठी शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दिनांक १७ जानेवारी २०१७ अन्वये श्री.के.पी.बक्षी, राज्य शासनाचे सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन करण्यात आली होती. प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग हे या समितीचे सदस्य होते. समितीने आपल्या अहवालाचा खंड-१ दि. ५ डिसेंबर, २०१८ रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशींवर निर्णय घेण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-** शासनाने राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-१ मधील शिफारशीं संदर्भात निर्णय घेतले आहेत. समितीच्या शिफारशी व त्यावर शासनाने घेतलेले निर्णय **याबाबतचा तपशील सोबतच्या प्रपत्रात नमूद करण्यात आला आहे.** प्रस्तुत शिफारशी स्वीकृत करण्याच्या परिणामस्वरूप ज्याप्रकरणी सविस्तर आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे, त्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून तिचा संकेतांक २०१९ ०१०११७०५४५०६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नितीन गद्रे)

प्रधान सचिव, (ले. व को.) वित्त विभाग

***(वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक : वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९ दिनांक :- १ जानेवारी, २०१९ सोबतचे जोडपत्र)***

## जोडपत्र

**राज्यशासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या आणि महागाई भत्त्यासंदर्भातील शिफारशीबाबतचे निर्णय**

*अ.क्र. : (अहवालातील परिच्छेद क्रमांक) : शिफारशींचा गोषवारा : शासनाने घेतलेले निर्णय :*

***(अ.क्र. : १) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.१) शिफारशींचा गोषवारा :*** **वेतन मॅट्रिक्स आधारित सुधारित वेतनश्रेण्या :** केंद्र शासनाने ७ व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार स्वीकारलेली वेतन मॅट्रिक्स संरचनेची संकल्पना राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांसाठी दिनांक १.१.२०१६ पासून लागू करण्याची समिती शिफारस करित आहे.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत.

***(अ.क्र. : २) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.२) शिफारशींचा गोषवारा : असुधारित वेतनसंरचनांचे विलिनीकरण***

(४.२.३) ७व्या वेतन आयोगात सुधारित वेतन मॅट्रिक्समधील दोन स्तरांमध्ये पुरेसा फरक रहावा हा दृष्टीकोन ठेऊन, तसेच परिच्छेद ४.२.२ मध्ये नमूद ग्रेड वेतने आधारभूत मानून आणि परिच्छेद ४.२.४ मध्ये नमूद ७ वेतन संरचनांचे (ग्रेड वेतनांचे) विलिनीकरण करून त्यांना सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये समकक्ष स्तराची शिफारस करण्यात येत आहे.

(४.४) ६ व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीच्या शिफारशीनुसार रु. ८०००-१३५०० या वेतनश्रेणीतील गट-ब संवर्गास वेतनबँड पीबी-३ : रु.१५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु.५४०० ही वेतन संरचना मंजूर केली आहे. ज्या संवर्गांचे या संबंधीचे प्रस्ताव वेतनत्रुटी समितीच्या विचारार्थ सादर झाले नव्हते, त्या संवर्गांना मात्र वेतन बँड पीबी-३ : रु.१५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु.५४०० या वेतन संरचनेचा लाभ मिळू शकला नाही.

वेतनत्रुटी समितीने स्वीकारलेला दृष्टीकोन योग्य वाटत असल्याने आता समिती वेतन बँड पीबी-३ : रु.१५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु.५४०० आणि वेतन बँड पीबी-२ : रु.९३०० + ग्रेड वेतन रु.५४०० या असुधारित वेतन संरचनांसाठी सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये एकच स्तर एस-२० ची शिफारस करत आहे.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत. मात्र यामुळे पदोन्नतीचे संवर्ग आणि निम्न संवर्गास एकच वेतन स्तर अनुज्ञेय झाल्यास या दोन्ही संवर्गाच्या वेतनमानात फरक ठेवणे आवश्यक राहील. याबाबत राज्य वेतन सुधारणा समितीने अहवालाच्या खंड २ मध्ये विचार करावा. वरील परिच्छेद क्रमांक ४.२.३ प्रमाणे शिफारस स्वीकृत.

***(अ.क्र. : ३) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.५) शिफारशींचा गोषवारा :*** **सुधारित वेतन मॅट्रिक्स :** ६ व्या वेतन आयोगातील विद्यमान वेतन संरचनांसाठी तक्ता क्र. ४.१ मधील सुधारित वेतन मॅट्रिक्सची शिफारस करण्यात येत आहे.

सर्व राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून त्यांच्या विद्यमान वेतनसंरचनांशी समकक्ष वेतन स्तर मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मात्र परिच्छेद ४.६ मध्ये नमूद संवर्गांच्या बाबतीत त्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे वेतन स्तर मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत.

***(अ.क्र. : ४) अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.६, ४.६.१ शिफारशींचा गोषवारा :*** (४.६) **महिला व बालविकास विभाग, जलसंपदा विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग** (अकृषी विद्यापीठे) यामधील काही संवर्गांच्या सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तरांविषयी शिफारशी

(४.६.१) **महिला व बालविकास विभाग - समुपदेशक :** वेतन बँड पीबी-२: रु. ९३००-३४८०० + रु. ४२०० ग्रेड वेतन आणि वेतन बँड पीबी-२: रु. ९३००-३४८०० + रु. ४३०० ग्रेड वेतन या दोन्ही वेतन संरचनेतील समुपदेशक या संवर्गास सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये एकच वेतन स्तर एस-१३ मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

***जलसंपदा विभाग***

(अ) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक

(ब) पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे

दि. २५ जुलै २०१४ आणि दि. ३० जून २०१६ रोजीच्या अधिसूचना रद्द करून वरील दोन्ही आस्थापनांवरील प्रत्येकी तीनही संवर्गांना पुढीलप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे :-

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | ६व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनसंरचना | |
|---|---|---|---|
| | | वेतनबँड (रु) | ग्रेडवेतन (रु) |
| १ | वैज्ञानिक अधिकारी/ उप मृद सर्वेक्षण अधिकारी | ९३००-३४८०० | ४६०० |
| २ | वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ९३००-३४८०० | ४५०० |
| ३ | कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ९३००-३४८०० | ४४०० |

वरील परिच्छेदामध्ये शिफारस केल्याप्रमाणे ६व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनसंरचना मंजूर करून पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

संबंधित संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि. १ जानेवारी २००६ पासून आता

शिफारस केलेल्या वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यात यावी. मात्र अतिप्रदानाची रक्कम वसूल करण्यात येऊ नये. तसेच आता शिफारस केलेल्या ६ व्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचना आधारभूत मानून ७ व्या वेतन आयोगात तक्ता क्रमांक ४.१ मध्ये नमूद केलेल्या सुधारित वेतन मॅट्रिक्समधील समकक्ष वेतन स्तर मंजूर करण्यात यावा.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत

***(४.६.३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग*** (अकृषी विद्यापीठे)

सर्व विद्यापीठांत शिक्षकेतर पदांच्या ६ व्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांची तपासणी करून संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून **झालेले अतिप्रदान वसूल करण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

तसेच योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब न करता निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील ज्या पदनामांमध्ये व वेतनश्रेण्यांमध्ये नियमबाह्य बदल केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे, अशी सर्व पदनामे व त्या पदांना मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या ७ **व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यापूर्वीच दिनांक** ७.१०.२००९ **च्या शासन अधिसूचनेनुसार कटाक्षाने पूर्ववत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने करावी, तसेच अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या त्वरीत शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस समिती करीत आहे.**

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब न करता निर्गमित केलेल्या शासन निर्णयांतील ज्या पदनामांमध्ये व वेतनश्रेण्यांमध्ये नियमबाह्य बदल केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे, अशी सर्व पदनामे व त्या पदांना मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यापूर्वीच दिनांक ७.१०.२००९ च्या शासन अधिसूचनेनुसार कटाक्षाने पूर्ववत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने करावी, **तसेच अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर त्वरीत शिस्तभंगाची कारवाई करावी.**

***(अ.क्र. : ५) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.७) शिफारशींचा गोषवारा :*** **मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी सुधारित वेतन स्तर :** मंत्रालयीन कामकाजाचे विशिष्ट स्वरुप विचारात घेऊन मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक संवर्गास विद्यमान वेतनबँड पीबी-१ + ग्रेड वेतन रु. १९०० या वेतन संरचनेतील एस-६ रु. १९९००-६३२०० या सुधारित वेतन मॅट्रिक्सऐवजी एस-८ या वेतन मॅट्रिक्समधील रु. २५५००-८११०० हा वेतनस्तर मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** या शिफारशीबाबत स्वतंत्रपणे अभ्यास करून नंतर उचित निर्णय घेण्यात येईल.

***(अ.क्र. : ६) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.८) शिफारशींचा गोषवारा :*** सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये वेतननिश्चिती : राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांची दि. १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये पुढीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी :-

विद्यमान वेतन संरचनेत दि. १ जानेवारी २०१६ रोजीच्या मूळ वेतनास (वेतन बँडमधील वेतन + ग्रेड वेतन) २.५७ ने गुणून नजीकच्या रुपयामध्ये पूर्णांकित (Rounding off) केलेली रक्कम संबंधित संवर्गास/पदास सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये अनुज्ञेय वेतन स्तरामधील सेलमध्ये (Cell) असल्यास ती रक्कम सुधारित वेतन ठरेल. जर ती रक्कम वेतन स्तरामधील सेलमध्ये नसेल तर सदर पूर्णांकित रकमेच्या लगतच्या पुढील सेलमधील रक्कम सुधारित वेतन ठरेल.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत. तसेच जे कर्मचारी दि. १ जानेवारी २०१६ रोजी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मंजूर वेतनश्रेणीत वेतन घेत असतील, अशा कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय समकक्ष सुधारित वेतन स्तरामध्ये करण्यात यावी.

***(अ.क्र. : ७) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.९) शिफारशींचा गोषवारा :*** सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनवाढीचा दिनांक : विद्यमान वेतन संरचनेतील १ जुलै या वेतनवाढीच्या दिनांकाऐवजी सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये १ जानेवारी किंवा १ जुलै असे दोन वेतनवाढीचे दिनांक असतील. कर्मचाऱ्यास त्याची नियुक्ती/पदोन्नती किंवा आर्थिक श्रेणीवाढ या बाबी विचारात घेऊन १ जानेवारी किंवा १ जुलै यापैकी एक वेतनवाढीचा दिनांक अनुज्ञेय होईल.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत.

***(अ.क्र. : ८) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.१०) शिफारशींचा गोषवारा :*** विशेष वेतन : ६ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना लागू केल्यानंतर सर्व संवर्गांचे विशेष वेतन बंद करण्यात आले होते. तथापि पोलीस शिपाई, नाईक आणि हवालदार या संवर्गांशी निगडित कर्तव्यांचे स्वरूप विचारात घेऊन त्या संवर्गांचे विद्यमान रु. ५०० दराने मिळत असलेले विशेष वेतन पुढे चालू ठेवण्यात आले होते. सदर विशेष वेतनात ५०% वाढ करून ते यापुढे देखील सुरू ठेवण्याची समिती शिफारस करीत आहे.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत.

***(अ.क्र. : ९) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.११) शिफारशींचा गोषवारा :*** **नियत/एकत्रित वेतनावरील अंशकालिन कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा** : सर्वसाधारणपणे ज्या कामांसाठी अंशकालिन कर्मचारी नियुक्त केले जातात अशी कामे आता बाह्यस्त्रोतामार्फत करण्याचे शासनाचे प्रचलित धोरण असल्याने नव्याने अंशकालिक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करणे अपेक्षित नाही. मात्र कार्यरत अंशकालिन कर्मचाऱ्यांच्या नियत/एकत्रित वेतनात सुधारणा करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय वित्त विभाग क्र. वेपुर-१२०९/प्र.क्र.२०/सेवा-९, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ अन्वये नियत/एकत्रित वेतनावरील अंशकालिन कर्मचाऱ्यांचे वेतन दुप्पट करून ते किमान रु. ६०० आणि कमाल रु. १२०० इतके करण्यात आले आहे. अंशकालिन कर्मचाऱ्यांचे सध्याचे नियत/एकत्रित दरमहा वेतन अडीच पट करण्यात यावे, ही वाढीव रक्कम किमान रु. १५०० आणि कमाल रु. ३५०० या मर्यादेत राहील, अशी समितीची शिफारस आहे.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत

***(अ.क्र. : १०) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.१२) शिफारशींचा गोषवारा :*** **महागाई भत्ता** : केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना दि.१.१.२०१६ पासून लागू करण्यात आलेले महागाई भत्त्याचे दर राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावेत.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत. केंद्र शासनाने वेळोवेळी मंजूर केल्याप्रमाणे महागाई भत्ता कार्यरत तसेच सर्व निवृत्तीवेतनधारकांना मंजूर करण्यात यावा.

***(अ.क्र. : ११) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.१३) शिफारशींचा गोषवारा :*** **शिफारशींची व्याप्ती** : या प्रकरणातील शिफारशी पात्र राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, न्यायालयातील अन्यायिक कर्मचारी, अनुदानित शाळेतील कर्मचारी, कृषि व अकृषि विद्यापीठे आणि त्यांना संलग्न अनुदान प्राप्त अशासकीय महाविद्यालयातील कर्मचारी तसेच इतर अनुदान प्राप्त संस्थांतील कर्मचाऱ्यांना लागू होतील. या शिफारशी इतर कार्यालयांतील/संस्थांतील कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा दिनांक राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे असावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत. या शिफारशी शासनाने ६ वा वेतन आयोग लागू केलेल्या व वेतन अनुदान मिळणाऱ्या इतर अनुदान प्राप्त संस्थांतील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात याव्यात.

***(अ.क्र. : १२) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ४.१४) शिफारशींचा गोषवारा :*** **अंमलबजावणीचा दिनांक** : राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दि. १ जानेवारी २०१६ पासून सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर अनुज्ञेय करण्यात यावेत आणि शिफारस केलेल्या वेतननिश्चितीच्या सूत्रानुसार वेतननिश्चिती करण्यात यावी.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत.

***(अ.क्र. : १३) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ७.१) शिफारशींचा गोषवारा :*** दिनांक १ जानेवारी २०१६ पासून दिनांक ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीसाठी वेतन व निवृत्तीवेतन सुधारित केल्यामुळे थकबाकीची रक्कम समान हप्त्यात अदा करण्यात यावी. निवृत्तीवेतनधारकांना रक्कम कमीत कमी हप्त्यात अदा करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

***शासनाने घेतलेले निर्णय :*** शिफारस स्वीकृत. सुधारित वेतनश्रेणीविषयक व अनुषंगिक लाभ या बाबतच्या शिफारशी दि. १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुधारित वेतनश्रेण्यांनुसार वेतनाचे प्रत्यक्ष लाभ दि. १ जानेवारी २०१९ पासून देण्यात यावेत.

सुधारित वेतन निश्चितीच्या परिणामी दि. १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीतील अनुज्ञेय थकबाकी पुढील आर्थिक वर्षापासून पुढील ५ वर्षांत ५ समान हप्त्यांमध्ये कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी/प्रकरणपरत्वे उचित निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात जमा करण्यात यावी. सदर रक्कम जमा केल्याच्या दिनांकापासून २ वर्षे काढून घेता येणार नाही.

***राज्यशासकीय कर्मचारी व अन्य पात्र कर्मचारी यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतच्या, राज्य वेतन सुधारणा समितीच्या शिफारशी स्वीकृतीबाबत.***

# महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

**शासन निर्णय, क्रमांक : वेतन-१११९/प्र.क्र.३/सेवा-३**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
***दिनांक :- १ जानेवारी, २०१९***

**प्रस्तावना** :- केंद्र शासनाने, केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांबाबतचा, सातवा वेतन आयोगाचा अहवाल स्वीकारून, सदर कर्मचाऱ्यांच्या वेतन संरचना दिनांक १ जानेवारी २०१६ पासून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर अहवालामध्ये जुन्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये फेरफार करून नवीन सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्याची, सातव्या केंद्र वेतन आयोगाची शिफारस देखील, केंद्र शासनाने स्वीकारलेली आहे.

केंद्र शासनाने, केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या धर्तीवर राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्यासाठी शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दिनांक १७ जानेवारी २०१७ अन्वये श्री.के.पी.बक्षी, राज्य शासनाचे सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग अशा दोन सदस्यांचा समावेश असलेली, त्रिसदस्यीय राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना करण्यात आली होती. केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार लागू केलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा आधार घेऊन तथापि त्यात उचित फेरफार करून, राज्य वेतन सुधारणा समिती-२०१७ यांनी, सातव्या वेतन आयोगाच्या अहवालाचा खंड-१ दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालातील, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत केलेल्या शिफारशी, स्वीकृत करण्याबाबतचा प्रस्ताव, शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, राज्यशासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतच्या राज्य वेतन सुधारणा समिती,२०१७ ने त्यांच्या अहवाल खंड-१ मध्ये केलेल्या शिफारशी, उचित फेरफारासह, स्वीकारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याबाबतचा तपशील सोबतच्या विवरणपत्रात नमूद करण्यात आला आहे. वरीलप्रमाणे सदरहू शिफारशी स्वीकृत केल्याच्या परिणामी, ज्याठिकाणी सविस्तर आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे, त्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून तिचा संकेतांक २०१९ ०१०११७१९४९२५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नितीन गद्रे)
प्रधान सचिव, (ले. व को.) वित्त विभाग

***(शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : वेतन-१११९/प्र.क्र.३/सेवा-३ दिनांक १ जानेवारी २०१९ सोबतचे विवरणपत्र)***

## विवरणपत्र

**राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालातील शिफारशी व त्यावर शासनाने घेतलेले निर्णय**

*अ.क्र. : (अहवालातील शिफारशींचे परिच्छेद क्रमांक :) शिफारशींचा गोषवारा : शिफारशींवर शासनाने घेतलेला निर्णय :*

***(अ.क्र. : १) (अहवालातील शिफारशींचे परिच्छेद क्रमांक : ५.४, ५.४.१, ५.४.२, ५.४.३, ५.४.४, ५.४.५, ५.४.६, ५.५, ५.५.१, ५.५.२, ५.५.४, ५.५.७, ५.५.८) शिफारशींचा गोषवारा :*** विविध संवर्गाच्या संघटनांनी केलेल्या मागण्यांचा साकल्याने विचार करून राज्यशासकीय कर्मचारी तसेच जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, १००% अनुदानित संस्था, स्वायत्त संस्था, कृषि विद्यापीठे, बिगर कृषी विद्यापीठे, अनुदानित संस्थांमधील शिक्षकेतर कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाच्या कालावधीत केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये (Modified Assured Career Progression Scheme) आवश्यक तो फेरफार करून ही योजना पुढीलप्रमाणे कार्यान्वित करण्यात यावी, अशी शिफारस ही समिती करीत आहे.

सहाव्या वेतन आयोगानुसार रु. ५४०० ग्रेड पे पर्यंतच्या मॅट्रीक्समध्ये वेतन आहारीत करणाऱ्या राज्यशासकीय कर्मचारी/अधिकारी यांना त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीत १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतर एकूण ३ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, लागू करण्यात यावी.

***शिफारशींवर शासनाने घेतलेला निर्णय :*** स्वायत्त संस्था सोडून इतर कर्मचाऱ्यांकरिता केलेल्या शिफारशी स्वीकारण्यात येत आहेत.

***(अ.क्र. : २) (अहवालातील शिफारशींचे परिच्छेद क्रमांक : ५.४.७) शिफारशींचा गोषवारा :*** या योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेयतेसाठी गोपनीय अहवाल प्रतवारीचा निकष हा ब+ असा राहील. तथापि वर्ग-४ मधील कर्मचारी तसेच मागासवर्गीय कर्मचारी यांच्या पदोन्नतीकरिता सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेले आदेश तसेच धोरण विचारात घेऊन त्यांची या योजनेअंतर्गत लाभासाठी पात्रता तपासण्यात येईल.

***शिफारशींवर शासनाने घेतलेला निर्णय :*** या योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेयतेसाठी गोपनीय अहवाल प्रतवारीच्या सरासरीचा निकष हा निकटच्या पदोन्नतीच्या पदासाठी सामान्य प्रशासन विभागाने विहित केल्यानुसार राहील, या बदलासह स्वीकृत.

***(अ.क्र. : ३) (अहवालातील शिफारशींचे परिच्छेद क्रमांक : ५.५.३) शिफारशींचा गोषवारा :*** पदोन्नतीची साखळी असलेल्या पदावर कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांना दि. १.१.२०१६ रोजी पासून दि.३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत लाभ अनुज्ञेय झाल्यास त्यांना सदर लाभ पुढीलप्रमाणे मंजूर होईल.

वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० पर्यंतच्या कमाल वेतन मर्यादेपर्यंत वेतन आहरीत करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना या नवीन योजनेअंतर्गत ७व्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय ठरेल. याचाच अर्थ संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पे मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० मध्ये वेतन आहरीत करेपर्यंतचा, यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ घेतल्यामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी वेतनस्तर एस-२० ओलांडला की, त्यास तद्नंतर त्यापुढील लाभ अनुज्ञेय राहणार नाही/नाहीत.

***शिफारशींवर शासनाने घेतलेला निर्णय :*** स्वीकृत. वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० या कमाल वेतन स्तरामध्ये वेतन आहरीत करेपर्यंतच लगतच्या शिफारशीनुसार लाभ संबंधितास अनुज्ञेय राहील. एकदा का संबंधित अधिकारी/कर्मचारी यांस एस-२१ हा वेतन स्तर लागू झाली की, त्यात त्यापुढचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

***(अ.क्र. : ४) (अहवालातील शिफारशींचे परिच्छेद क्रमांक : ५.५.५) शिफारशींचा गोषवारा :*** मंत्रालयातील लिपिक-टंकलेखक या संवर्गास ७व्या वेतन आयोगात सुधारित वेतनश्रेणीतील शिफारस केल्याच्या परिणामी त्यांच्याकरिता आश्वासित प्रगती योजनेच्या अनुषंगाने समितीने प्रकरण ४ च्या परिच्छेद ४.७ मध्ये शिफारस केली आहे.

***शिफारशींवर शासनाने घेतलेला निर्णय :*** मंत्रालयातील लिपिक-टंकलेखकांना राज्यातील इतर ठिकाणांच्या लिपिक-टंकलेखकांपेक्षा वेगळी वेतनश्रेणी द्यावी, ह्या समितीच्या शिफारशीवर स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येणार असल्यामुळे, समितीच्या ह्या शिफारशींच्या अनुषंगाने देखील नंतरच निर्णय घेण्यात येईल.

***(अ.क्र. : ५) (अहवालातील शिफारशींचे परिच्छेद क्रमांक : ५.५.६) शिफारशींचा गोषवारा :*** अगोदरच शासन सेवेत कार्यरत असताना दि.१.१.२०१९ नंतर लाभ अनुज्ञेय ठरणाऱ्या, पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांना दि. १.१.२०१९ रोजी व नंतरच्या कालावधीत अनुज्ञेयता वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० पर्यंतच्या कमाल वेतन मर्यादेपर्यंत वेतन आहरीत करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना या नवीन योजनेअंतर्गत ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय राहील. याचाच अर्थ संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पे मॅट्रीक्समधील वेतन स्तर-२० मध्ये वेतन आहरीत करेपर्यंतच, यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय ठरेल. पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ घेतल्यामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी वेतनस्तर एस-२० ओलांडला की, त्यास तद्नंतर त्यापुढील लाभ अनुज्ञेय राहणार नाही/नाहीत.

***शिफारशींवर शासनाने घेतलेला निर्णय :*** स्वीकृत. याचाच अर्थ त्यास यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ हा वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-२० या कमाल वेतन स्तरामध्ये वेतन आहरीत करेपर्यंतच अनुज्ञेय राहील. एकदा का संबंधित अधिकारी/कर्मचारी यांस वेतन स्तर एस-२१ लागू झाला की, त्यास त्यापुढचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

** AF : P 25 **

***राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ सेवानिवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारक यांना द्यावयाच्या अनुषंगिक लाभाबाबत.....***

# महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

**शासन निर्णय क्रमांक : निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४**

**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**

***दिनांक :- १ जानेवारी, २०१९***

**प्रस्तावना :-** केंद्राच्या ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंबनिवृत्तीवेतनात शासनाच्या निर्णयांच्या आधारे राज्यशासकीय व इतर पात्र निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारक कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतनात सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्यासाठी शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दि. १७ जानेवारी, २०१७ अन्वये श्री.के.पी.बक्षी, राज्य शासनाचे सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ची स्थापना करण्यात आली होती. प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग हे या समितीचे सदस्य होते. समितीने आपल्या अहवालाचा खंड-१ दिनांक ५ डिसेंबर २०१८ रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशी स्वीकृत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-** शासनाने राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड-१ मधील शिफारशी काही सुधारणांसह स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. समितीच्या शिफारशी व त्यावर शासनाने घेतलेले निर्णय याबाबतचा तपशील सोबतच्या प्रपत्रात नमूद करण्यात आला आहे. प्रस्तुत शिफारशी स्वीकृत करण्याच्या परिणामस्वरूप ज्याप्रकरणी सविस्तर आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे, त्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

२. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठे यांमधील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहील.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुका अन्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून तिचा संकेतांक २०१९ ०१०११७२९०२८१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नितीन गद्रे)

प्रधान सचिव (ले.व.को.), वित्त विभाग

***(शासन निर्णय, वित्त विभाग क्र.निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४ दिनांक :- १ जानेवारी, २०१९ चे प्रपत्र)***

## प्रपत्र

**राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या अहवालातील निवृत्तीवेतन व अनुषंगिक लाभासंदर्भातील शिफारशी**

*अ.क्र. : (अहवालातील परिच्छेद क्रमांक :) शिफारशींचा गोषवारा :*

*वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :*

***(अ.क्र. : १) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ६.२.१ व ६.५) शिफारशींचा गोषवारा :*** राज्यशासनाने सहाव्या वेतन आयोगानुसार कमीत कमी निवृत्तीवेतन रु. २८८२/- ठरविले असून त्यास २.५७ ने गुणून येणारी रक्कम ७४१०/- येत आहे. तथापि, सदरची रक्कम कमी वाटत असल्याने आणि केंद्राने सातव्या वेतन आयोगात कमीत कमी निवृत्तीवेतन रु. ९०००/- इतके केलेले असल्याने राज्यशासनाच्या दिनांक ०१.०१.२०१६ पूर्वी सेवानिवृत्त निवृत्तीवेतनधारकांना कमीत कमी निवृत्तीवेतन रु. ७५००/- करण्याची समितीची शिफारस आहे. दिनांक १.१.२०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांनाही त्यांच्या निवृत्तीवेतनास २.५७ ने गुणून अनुज्ञेय होणाऱ्या सुधारित निवृत्तीवेतनाच्या शिघ्रगणकानुसार वेतननिश्चिती करण्याची पद्धत अवंलबण्याबाबत समितीची शिफारस आहे.

***वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :*** स्वीकृत

***(अ.क्र. : २) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ६.४.१) शिफारशींचा गोषवारा :*** दि. १.११.२००५ पासून शासन सेवेत नव्याने दाखल झालेल्या उमेदवारांना परिभाषित अशंदान योजना लागू करण्यात आली आहे. ही योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या कमीत कमी १०% मासिक अशंदान द्यावे लागते. तसेच १०% अशंदान शासनामार्फत देण्यात येते. सुधारित वेतनसंरचनेमुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनात लक्षणीय वाढ होणार असल्याने या योजनेखाली देण्यात येणाऱ्या शासकीय अंशदानाच्या रक्कमेतही दि. १.१.२०१६ पासून भरीव वाढ होईल.

***वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :*** स्वीकृत

***(अ.क्र. : ३) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ६.६.१) शिफारशींचा गोषवारा :*** राज्यशासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही सेवेत असतांना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसास १० वर्षांपर्यंत उच्चतम दराने कुटुंब निवृत्तीवेतन अदा करण्याची सध्या अस्तित्वात असलेली तरतूद सातव्या वेतन आयोगातही कायम ठेवण्याची समितीची शिफारस आहे.

***वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :*** स्वीकृत

***(अ.क्र. : ४) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ६.६.२) शिफारशींचा गोषवारा :*** शासकीय कर्मचाऱ्याचा सेवानिवृत्तीनंतर मृत्यू झाल्यास मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाच्या कुटुंब निवृत्तीवेतनाबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार अस्तित्वात असलेल्या तरतुदी या सातव्या वेतन आयोगातही यापुढे तशाच ठेवण्यात याव्यात अशी शिफारस आहे.

***वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :*** स्वीकृत

***(अ.क्र. : ५) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ६.७) शिफारशींचा गोषवारा :*** राज्यशासनाने त्यांच्या अतिवृद्ध निवृत्ती वेतनधारकांकरिता सरसकट १०% निवृत्तीवेतनात वाढ यापूर्वीच केलेली आहे. सातव्या वेतन आयोगामध्ये सदर दरांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याची समितीची शिफारस आहे.

वय वर्षे ८० ते ८५ - मूळ निवृत्तीवेतनात १०% वाढ

वय वर्षे ८५ ते ९० - मूळ निवृत्तीवेतनात १५% वाढ

वय वर्षे ९० ते ९५ - मूळ निवृत्तीवेतनात २०% वाढ

वय वर्षे ९५ ते १०० - मूळ निवृत्तीवेतनात २५% वाढ

वय वर्षे १०० व त्यावरील मूळ निवृत्तीवेतनात ५०% वाढ

सदर वाढ ही दि. १.१.२०१६ पासून लागू करण्याची समिती शिफारस करीत आहे.

***वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :*** स्वीकृत

***(अ.क्र. : ६) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ६.३.१ आणि ६.८.१) शिफारशींचा गोषवारा :*** राज्यशासनाच्या निवृत्तीवेतनधारकांना सेवानिवृत्त झाल्यानंतर सुरू असलेल्या सेवा-नि-उपदानाची मर्यादा रु.७ लाख इतकी असून रु.१४ लाख इतकी करण्याची समितीची शिफारस आहे.

***वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :*** स्वीकृत

***(अ.क्र. : ७) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ६.८.२) शिफारशींचा गोषवारा :*** राज्यशासनाच्या शासकीय कर्मचाऱ्याचे सेवेत असताना निधन झाल्यास त्याच्या कुटूंबाला देय असलेल्या मृत्यू-नि-सेवा-उपदानाच्या दरांमध्ये केंद्र सरकारच्या सातव्या वेतन आयोगानुसार केलेल्या बदलाप्रमाणे खालीलप्रमाणे वाढ प्रस्तावित करण्यात येत आहे.

सेवेचा कालावधी - मृत्यू उपदानाचा दर

१. सेवा १ वर्षापर्यंत – अंतिम वेतनाच्या दुप्पट

२. सेवा १ वर्षे पेक्षा जास्त व ५ वर्षांपर्यंत – अंतिम वेतनाच्या सहापट

३. सेवा ५ वर्षे पेक्षा जास्त व ११ वर्षांपर्यंत – अंतिम वेतनाच्या १२ पट

४. सेवा ११ वर्षे पेक्षा जास्त व २० वर्षांपर्यंत - अंतिम वेतनाच्या २० पट

५. सेवा २० वर्षे पेक्षा जास्त – अर्हताकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी अंतिम वेतनाच्या निम्मे मात्र अंतिम वेतनाच्या ३३ पटीच्या मर्यादेत कमाल १४ लाखांच्या मर्यादेत.

***वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :*** स्वीकृत

***(अ.क्र. : ८) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ६.९) शिफारशींचा गोषवारा :*** राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांकरीताही सहाव्या वेतन आयोगात निवृत्तीवेतनाच्या जास्तीत जास्त ४०% इतके निवृत्तीवेतन अंशराशीकरण करणे व अंशराशीकरण रकमेच्या कपातीचा अवधी (१५ वर्षे) इतकाच आहे. त्याच धर्तीवर सातव्या वेतन आयोगात राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही निवृत्तीवेतनाच्या अंशराशीकरणासाठी सध्या अस्तित्वात असलेली तरतूद यापुढेही कायम ठेवण्याची समितीची शिफारस आहे.

**वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :** स्वीकृत. अंशराशीकरणांच्या फरकांची थकबाकीची रक्कम एका हप्त्यात देण्यात यावी.

***(अ.क्र. : ९) (अहवालातील परिच्छेद क्रमांक : ६.१०) शिफारशींचा गोषवारा :*** उपरोक्त सर्व लाभ निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना दि. १.१.२०१६ पासून लागू राहतील. त्यांना सदर लाभ कमीत कमी हप्त्यात देण्यात यावे. राज्यशासनाच्या सातव्या वेतन आयोगानुसार नमूद सर्व सुधारणा राज्यशासकीय कुटुंब निवृत्तवेतनधारकांनाही योग्य त्या फेरफारासह लागू करण्याची शिफारस करीत आहे.

***वित्त विभागाचे अभिप्राय/प्रस्ताव :*** स्वीकृत. निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना थकबाकीची रक्कम ३ वर्षात ३ समान हप्त्यात रोखीने देण्यात यावी.

** AF : P 37 **

*राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ सेवानिवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारक यांना द्यावयाच्या अनुषंगिक लाभाबाबत.....*

## महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

शासन शुद्धीपत्रक क्रमांक : निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४ : मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

***दिनांक :- ४ जानेवारी, २०१९***

**वाचा** :- वित्त विभाग, शासन निर्णय क्र. निवेसु-२०१८/प्र.क्र.१३०/सेवा-४, दि.१.१.२०१९.

